////आतील पानात वाचा

- सिंहस्थ कुंभमेळा आणि वृक्षप्रेम...!
- राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व मनोहर जोशी
- चला, जगण्याची मजा घेऊ या...!



दैनिक **अक्षराज**

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध



Email : newsaksharaj2021@gmail.com








वर्ष : ०५ | अंक : १०९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.०२ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# आधी मोदी सरकारच्या शिष्टमंडळाचं नेतृत्व, आता काँग्रेसच्या बैठकांना दांडी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, नवी दिल्ली :** हरियाणा, दिल्ली, महाराष्ट्र, बिहारमधील विधानसभा निवडणुकांमधील पराभवांमुळे काँग्रेसमध्ये ऑल इज नॉट वेल अशी स्थिती आहे. त्यातच आता एका दिग्गज नेत्याच्या हालचाली पक्षासाठी अडचणीच्या ठरत आहेत. केरळमधून सलग चौथ्यांदा लोकसभेवर गेलेल्या, राज्यात पक्षाचा चेहरा असलेल्या शशी थरुर यांचं नेमकं चाललंय काय, अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु झाली आहे.



केरळच्या तिरुअनंतपुरममधून मतदारसंघातून सलग चौथ्यांदा लोकसभेवर निवडून गेलेले शशी थरुर काँग्रेसच्या कार्य समितीचे सदस्य आहेत. आजपासून संसदेच्या हिवाळी अधिवेशनाला सुरुवात झाली. या पार्श्वभूमीवर सोनिया गांधी यांच्या नेतृत्त्वात काल काँग्रेसची बैठक झाली. यात पक्षाची रणनीती निश्चित करण्यात आली. सोनिया गांधी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत अधिवेशन काळातील पक्षाची रणनीती ठरवली गेली. या बैठकीला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते. पण खासदार शशी थरुर गैरहजर होते.


काँग्रेस खासदार शशी थरुर यांनी त्यांच्या गैरहजेरीबद्दल स्पष्टीकरण दिलं आहे. जाणुनबुजून बैठकीला दांडी म रली, असा विषय नाही. बैठक झाली तेव्हा मी विमानात होतो. केरळहून दिल्लीला जात होतो. याआधी काँग्रेसची एसआयआरवर बैठक झाली. त्या बैठकीलादेखील शशी थरुर अनुपस्थित राहिले होते. त्यावेळी त्यांनी प्रकृती अस्वस्थ असल्याचं कारण दिलं होतं.

शशी थरुर एकीकडे काँग्रेसच्या बैठकीला अनुपस्थित राहिले. पण दुसरीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कार्यक्रमाला हजर होते. या कार्यक्रमावरुन त्यांनी मोदींचं तोंड भरुन कौतुक केलं. त्यांनी या संदर्भात एक पोस्ट शेअर केली होती.

सर्दी आणि ताप असतानाही प्रेक्षकांमध्ये असल्यानं मी आनंदात आहे, असं थरुर यांनी पोस्टमध्ये नमूद केलं होतं. हा कार्यक्रम भारताच्या आकांक्षा आणि सांस्कृतिक दिशेच्या चिंतनासाठी महत्त्वाचा असल्याचं थरुर यांनी म्हटलं होतं.

गेल्या काही वर्षांपासून काँग्रेस आणि थरुर यांचे संबंध बिघडत चालले आहेत. एप्रिलमध्ये पहलगाम जिल्ह्यात दहशतवादी हल्ला झाला. त्याचा बदला म्हणून ऑपरेशन सिंदूर राबवण्यात आलं. या ऑपरेशनची माहिती जगभरात देण्यासाठी सरकारनं खासदारांच्या काही टिम तयार केल्या होत्या. यातील एका टिमचं नेतृत्व थरुर यांनी केलं होतं. त्यांनी भारताची भूमिका अमेरिकेत मांडली होती.

## राष्ट्रवादीतील अस्वस्थतेनंतर रुपाली पाटील यांचा मोठा निर्णय



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली पाटील ठोंबरे यांचा पक्षाचा शहर कार्याध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. पक्षामधील नाराजीनंतर रुपाली पाटील यांनी थेट पक्षश्रेष्ठी अजित पवार यांच्याकडे राजीनामा सुपूर्द केला. अजित पवार यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर पक्षातून बाहेर पडण्यासंदर्भात निर्णय घेणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं. रुपाली पाटील या पुण्यातील माजी नगरसेविका आहेत. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला रामराम ठोकून २०२१ मध्ये रुपाली पाटलांनी राष्ट्रवादीत प्रवेश केला होता.

नुकतीच रुपाली पाटील यांनी शिवसेना खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतली होती. त्यामुळे त्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करण्याची चर्चा होती. मात्र ही भेट राजकीय नसल्याचं सांगत त्यांनी याआधी 'घड्याळ' सोडण्याच्या चर्चा फेटाळून लावल्या होत्या. परंतु पक्षांतर्गत वादामुळे अस्वस्थ असलेल्या रुपाली पाटील राष्ट्रवादीला रामराम ठोकणं निश्चित मानलं जात होतं.

**•रुपाली विरुद्ध रुपाली !**

रूपाली चाकणकर आणि रूपाली पाटील यांच्यामधील अंतर्गत वाद काही दिवसांपासून उफाळून आले आहेत. बीडमधील डॉक्टर तरुणीच्या आत्महत्या प्रकरणात त्यांना न्याय न देता, त्यांच्या चारित्र्यावर आघात करण्यात आल्याचा दावा करत या अन्यायाविरुद्ध आपण आवाज उठवणार, माझा आवाज दाबला जाईल? असा सवाल रुपाली पाटील यांनी केला होता. आमचा इतिहास अन्याय सहन करणाऱ्यांचा नाही, तर गरज पडल्यास ख्वाडा करणाऱ्यांचा आहे, असा इशारा रुपाली पाटील यांनी चाकणकर यांना दिल्याने दोन रुपालींमधील पक्षांतर्गत वाट चव्हाट्यावर आला होता.

**•प्रवक्ते आणि स्टार प्रचारकांच्या यादीतून डच्चू**

स्थानिक स्वराज्य संस्था आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली होती. आधी प्रवक्त्यांच्या यादीत स्थान न मिळालेल्या आमदार अमोल मिटकरी यांची स्टार प्रचारकांच्या यादीत वर्णी लागली, परंतु रुपाली पाटील ठोंबरे यांना स्टार प्रचारकांच्या यादीतूनही डच्चू मिळाला होता. त्यामुळे रुपाली पाटील यांची पक्षातून गच्छंती निश्चित मानली जात होती.

## कारसह विहिरीत आढळले दोघांचे मृतदेह

**दि.०१, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यातील वडनेर भोलजीजवळ झालेल्या अपघातामध्ये तेलंगणा राज्यातील दाम्पत्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. पद्मसिंह दामू पाटील व त्यांची पत्नी नम्रता पाटील असं या दाम्पत्याचं नाव आहे. अचानक त्यांचं लोकेशन आणि मोबाईल नॉट रिचेबल झाल्यानं नातेवाईकांमध्ये खळबळ माजली होती. शोधाशोध सुरू झाल्यानंतर रस्त्यालगत असलेल्या एका विहिरीमध्ये त्यांची कार आणि दाम्पत्याचा मृतदेह आढळून आला. मात्र, आता या घटनेत एक नवीन गोष्ट समोर आली आहे.

**जुनी कार ठरली जीवघेणी...** पद्मसिंह पाटील यांनी अलीकडेच नवीन कार घेतली होती. जुनी कार जळगावला नेण्यासाठी तेलंगणा ते खान्देशमधील जळगाव जिल्ह्यापर्यंत असा ८०० किलोमीटरचा प्रवास त्यांनी स्वतःच करण्याचा निर्णय घेतला. एरवी ते विमानाने प्रवास करत असत. मात्र, यावेळी कारने जाण्याचं ठरवलं पण नियतीने घात केला आणि हा प्रवास त्यांच्यासाठी जीवघेणा ठरला.

**नेमकं काय घडलं?** जळगाव जिल्ह्यातील पारोळामधील वाघुळखेडा येथील पद्मसिंह दामू पाटील हे तेलंगणा राज्यातील सुरत जिल्ह्यात सिमेंट कंपनीत गेल्या पाच वर्षापासून नोकरीला होते. पत्नी आणि मुलीसह ते तेथेच राहत होते. त्यांच्या परिवारात विवाह सोहळा असल्याने पद्मसिंह पाटील हे पत्नीसह आपल्या कारने गुरुवार दि. २७ नोव्हेंबर रोजी सकाळी सहाच्या सुमारास तेलंगणातील त्यांच्या गावावरून पाचोरासाठी निघाले होते.

**'आम्ही रात्री १० वाजेपर्यंत जळगाव येथे पोहोचू'**

सायंकाळी सहाच्या सुमारास त्यांच्या चुलत भावासोबत संवाद झाला असता 'आम्ही रात्री १० वाजेपर्यंत जळगाव येथे पोहोचू', असं त्यांनी सांगितलं होतं. रात्री उशिरापर्यंत ते न आल्यानं कुटुंबातील सदस्यांनी त्यांच्या व पत्नीच्या मोबाईलवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. दोघांची फोन लागले नाहीत.

## चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी कारवाई !

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** चंद्रपूर स्थानिक गुन्हे शाखेने गोवंश तस्करीच्या २ कारवायांमध्ये ९ गोवंश, ४ म्हैस व १ वगार यांची सुटका करीत ७ आरोपींवर गुन्हा दाखल करुन एकूण ३७ लक्ष ४० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.




पहिल्या कारवाईत ३० नोव्हेंबर ला गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे बल्लारपूर अंतर्गत मौजा मानोरा रोडवर नाकाबंदी करीत तीन पिकअप वाहन क्रमांक एमएच ३३ टी ०४५२, एमएच ३४ बीझेड ५०८३ व एमएच ३४ बीजी ३९५६ यांना थांबवित झडती घेतली असता त्यामध्ये ९ गोवंश जनावरे आढळून आले. सदर जनावरे हे कत्तलीसाठी कोंबून नेत होते. गुन्हे शाखेने या प्रकरणात २७ वर्षीय राहुल दशरथ नाकाडे, २५ वर्षीय अनिल नारायण सहारे, ३८ वर्षीय रामेश्वर अरुण करंबे तिन्ही राहणार ब्रम्हपुरी, ४३ वर्षीय रणजित पुंजाराम ढोंगे व पाहिजे असलेला आरोपी पिंटू सय्यद रा. ब्रम्हपुरी यांच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ४९ अंतर्गत महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम गुन्हे दाखल करण्यात आले. या कारवाईत एकूण २९ लक्ष ७० हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तर दुसऱ्या कारवाईत रामनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील जुनोना फाटा परिसरात नाकाबंदी करीत गोवंश तस्करांचे वाहन क्रमांक एमएच २६ सीएच ३६०१ ला पोलिसांनी थांबवित झडती घेतली असता त्यामध्ये ४ नग म्हैस व एक वगार कोंबलेल्या अवस्थेत होते. सदर जनावरे कत्तलीकरीता नेत होते. या प्रकरणी २४ वर्षीय पांडुरंग विठ्ठल तडेकोट व २८ वर्षीय तिरुपती तुळशीराम सादगिरे दोघेही राहणार नांदेड यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला. या कारवाईत ७ लक्ष ७० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन्ही कारवाईत पोलिसांनी ३७ लक्ष ४० हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

सदरची यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा पेलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वात सपोनि दिपक कांक्रेडवार, बलराम झाडोकर, पोउपनि विनोद भुरले, संतोष निंभोरकर, पोलीस पथक कर्मचारी धनराज करकाडे, सुरेंद्र महतो, जयंत चुनारकर, प्रदिप मडावी, अजित शेंडे, सुमित बरडे, प्रफुल गार्गात, नितेश महात्मे, व मिलींद टेकाम यांनी केली.

## रेल्वेच्या धडकेत वाघिणीचा मृत्यू ! चनाखा गावालगतच्या जंगलातील घटना

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** बल्लारशाह काजीपेठ रेल्वे रुळावरील चनाखा गावालगतच्या जंगलात रेल्वेच्या धडकेत सात वर्षाच्या वाघिणीचा मृत्यू झाला. ही घटना रविवार ३० नोव्हेंबर ला पहाटेच्या सुमारास घडली. वनविभागातील अधिकाऱ्यांनी घटनेची माहिती कळताच घटनास्थळ गाठून पंचनामा करुन वाघिणीच्या मृतदेहाला विच्छेदनासाठी चंद्रपूर वॉईल्ड लाईफ केंद्रात पाठविले.



चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारशाह ते काजीपेठपर्यंत सेंट्रल साऊथ रेल्वे लाईन आहे. राजुरा वनपरिक्षेत्राअंतर्गत चनाखा बीट कक्ष क्रमांक १६० येथून डाऊन लाईनवरुन जाणाऱ्या मालगाडीखाली आल्याने पहाटेच्या दरम्यान या वाघिणीचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे २००८ पासून याच रेल्वे रुळावर अपघातात तीन वाघ, तीन अस्वल, एक बिबट्या, एक निलगाय, एक चितळ आणि अनेक वन्यप्राण्यांना आपला जीव गमवावा लागला.

हा वन्यजीवांचा जंगली प्राण्यांचा ये-जा करण्याचा मुख्य मार्ग आहे. वन्यप्राण्यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात रेल्वे प्रशासनाने कोणतेही सुरक्षा कवच किंवा योग्य उपाययोजना उपलब्ध न केल्याने प्राण्यांचा नाहक बळी जात आहे. वन्यजीवांच्या सुरक्षिततेकरीता भूमिगत बोगदा, पूल, रेल्वे रुळाच्या दोन्ही बाजुला सुरक्षा भिंत उभारावी याकरीता वन विभागाने अनेकदा रेल्वे विभागाशी पत्रव्यवहार केला. परंतू रेल्वे प्रशासनाने या पत्रांना केराची टोपली दाखवली. त्यामुळे स्थानिक वन्यजीव प्रेमी, नैसर्गिक पर्यावरण संवर्धन व मानवता विकास संस्था यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, रेल्वे प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करुन भविष्यातील वन्यप्राण्यांच्या जीविताशी होणारा खेळ थांबवावा. आणखी किती प्राणी मेल्यावर रेल्वे प्रशासनाला जाग येणार, असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

## दोन सराईत दुचाकी चोरटे जेरबंद ! कोतवाली पोलिसांची कामगिरी ; २४ दुचाकी हस्तगत

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, अहिल्यानगर :** शहरात आणि आसपासच्या परिसरात दुचाकी चोरीच्या वाढत्या घटनांवर कोतवाली पोलिसांनी मोठी कारवाई करत दोन सराईत चोरट्यांना जेरबंद केले आहे. त्यांच्याकडून ६ लाख २५ हजार रूपये किमतीच्या तब्बल २४ दुचाकी जप्त करण्यात आला आहे. तांत्रिक तपास, सीसीटीव्ही विश्लेषण व गुन्हे शोध पथकाच्या सततच्या माहिती संकलनातून ही मोठी कामगिरी झाली.




असिफ इकबाल सय्यद (वय ३८, रा. रंगार गल्ली, अहिल्यानगर, हल्ली रा. आलमगीर, भिंगार) व आझाद ऊर्फ आज्या हारून शेख (वय ३२, रा. आलमगीर, भिंगार) अशी अटक केलेल्या संशयित आरोपींची नावे आहेत. पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी दुचाकी चोरी प्रकरणांची उकल करण्यासाठी गुन्हे शोध पथकाला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार उपनिरीक्षक गणेश देशमुख व त्यांच्या पथकाने कोतवाली हद्दीत चोरी झालेल्या दुचाकींचे सीसीटीव्ही फुटेज गोळा करून त्याचे तांत्रिक विश्लेषण केले. त्यात संशयित इसम असिफ इकबाल सय्यद याचा सहभाग स्पष्ट झाला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने आपल्या साथीदारासोबत केलेल्या सलग चोरीची कबुली दिली. असिफ सय्यद याच्या चौकशीत त्याचा साथीदार आझाद उर्फ आज्या हारून शेख याचा सहभाग उघडकीस आला. पोलिसांनी जामखेड येथून आझाद शेख याला ताब्यात घेऊन कोतवाली येथे आणले. दोघांनी मिळून केवळ कोतवाली हद्दीतच नव्हे तर नेवासा, भिंगार कॅम्प परिसरात मिळून एकूण २४ दुचाकी चोरी केल्याची कबुली दिली. सखोल विचारपूस करताच दोघांनी लपवून ठेवलेल्या सर्व दुचाकी पंचनामा करून जप्त करण्यात आल्या. ही कारवाई निरीक्षक गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक देशमुख, अंमलदार बाळकृष्ण दौंड, वसिम पठाण, शाबीर शेख, विशाल दळवी, विनोद बोरगे, वाकचौरे, दिलिप रोहकले,सत्यम शिंदे, शिरीष तरटे, दत्तात्रय कोतकर,अभय कदम,सुरज कदम, अमोल गाढे, अतुल काजळे, सचिन लोळगे,राम हंडाळ, अतुल शेंडे, अतुल लाटे, गुलाब शेख, महेश पवार, महिला अंमलदार दरंदले,तोरडमल, पंडित, मोबाईल सेलचे अंमलदार राहुल गुड्डू यांच्या पथकाने केली.




## महाराष्ट्राच्या राजकारणात भूकंप घडणार

नागपूर : राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची धामधूम सुरू असताना 'ऑपरेशन लोटस' या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये पुन्हा एकदा वादाची ठिणगी पडली आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी भाजप पुन्हा एकदा ऑपरेशन लोटस करण्याच्या तयारीत असल्याचा आरोप केला होता. त्यांच्या या विधानावर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी थेट प्रतिहल्ला चढवत पटोले यांच्या वक्तव्याला वैफल्यग्रस्त मनस्थितीचे परिणाम असल्याची टीका केली आहे.

नाना पटोले दोनशे मतांनी जिंकून आले होते. त्यांना पुढील पराभव निश्चित दिसत असल्यामुळेच ते अशी विधाने करत आहेत. काँग्रेसमध्येच विसंवाद आणि अस्थिरता वाढत आहे. त्यामुळे लोक काँग्रेस सोडत आहेत. भाजपला कोणतेही ऑपरेशन करण्याची गरज नाही, काँग्रेसचे नेते स्वतःहून आमच्याकडे येत आहेत, असं चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. काँग्रेसमध्ये अंतर्गत गटबाजी वाढत आहे. नाना पटोले यांनी अलीकडेच त्यांच्या गड मानल्या जाणाऱ्या साकोली येथे देखील काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी पक्ष सोडला. हेच वास्तव नाना पटोले स्वीकारत नाहीत आणि त्यावर पडदा टाकण्यासाठी ऑपरेशन लोटसचा मुद्दा पुढे करत आहेत, असा टोला बावनकुळे यांनी लगावला.

भाजपमध्ये अनेक काँग्रेसचे पदाधिकारी प्रवेशासाठी इच्छुक आहेत. आम्हाला अनेक लोक भेटले आहेत. पण आम्ही त्यांना दोन तारखेचा निकाल लागेपर्यंत थांबण्यास सांगितले आहे. नगर पालिका निकालानंतर काँग्रेसमध्ये मोठे राजकीय खिंडार पडण्याची भीती पटोले यांनी मनात धरली आहे, म्हणूनच ते अशा प्रकारचे आरोप करत आहेत. काँग्रेसची बचाव मोहीम सुरू आहे. पक्षात स्पष्ट नेतृत्व नाही, समन्वय नाही. अनेक नेते भाजपसोबत उभे राहण्यास इच्छुक आहेत, असा मोठा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला.

तीन तारखेला निकालाच्या दिवशी कळेल, संध्याकाळी आम्ही बसू, चार तारखेला बसू, पण महायुतीमध्ये हे ठरलं होतं ज्या ज्या ठिकाणी मित्रपक्ष त्या त्या ठिकाणी टीका टीपण्णी न करता मैत्रिपूर्ण निवडणुका लढा. राज्यात महायुतीत नगरपालिका निवडणुकीत जे मतमतांतरे झाले त्याचा काही फरक पडणार नाही. महायुतीत जो समन्वय आहे तो आम्ही पुन्हा निर्माण करु आणि समन्वयाने पुन्हा या राज्यातील महायुती टिकऊ, अशी प्रतिक्रिया चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

## ३८ वर्षीय तरुणाच्या मृत्यूमुळे परिसरात खळबळ...

**दि.०१, नाशिक :** सातपूर येथील स्वारबाबानगर परिसरात राहणाऱ्या ३८ वर्षीय व्यक्तीवर धारदार हत्याराने सपासप वार करून निर्घृण खून केल्याची घटना शनिवारी रात्री उशिरा गोवर्धन परिसरात घडली. हत्येमागचे नेमके कारण अद्याप समोर आले नसल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक तालुका पोलिसांत या प्रकरणी अज्ञाताविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे. खुनाचे कारण अद्याप अस्पष्ट असून, स्थानिक गुन्हे शाखांसह इतर पथकांना संशयितांच्या मागावर पाचारण करण्यात आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, अरविंद पशुपतिनाथ पांडे ऊर्फ पप्पू पांडे (वय ३८, रा. लोंढे चाळ, सातपूर, मूळ रा. बिहार) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. याबाबत मृताचा भाचा रजनीश हरेंद्र तिवारी याने नाशिक तालुका पोलिसांत फिर्याद दिली आहे. चेहरा ठेचलेल्या अवस्थेत मृतदेह गोवर्धन गावातील एका विजेच्या खांबाजवळ चेहरा ठेचलेल्या आणि अंगावर प्रचंड जखमा असलेल्या अवस्थेत पांडे याचा मृतदेह आढळला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी वासुदेव देसले, तालुका पोलिस ठाण्याच्या निरीक्षक मृदुला नाईक व फॉरेन्सिक पथकाने आवश्यक कार्यवाही करून पुढील तपासाला सुरुवात केली. मृत्यूमागचे नेमके कारण काय आणि या हत्येला कोण जबाबदार आहे याचा शोध पोलीस लावत असून, तपास सुरू आहे.

# सिंहस्थ कुंभमेळा आणि वृक्षप्रेम !



दर १२ वर्षांनी राज्यातील नाशिक नगरीत भरणारा सिंहस्थ कुंभमेळा महाराष्टासाठी अत्यंत सौभाग्याची आणि अभिमानाची बाब आहे. प्रभू श्रीरामचंद्राच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या नाशिक नगरीत सिंहस्थ पर्वाच्या निमित्ताने देश आणि विदेशातील लाखो साधू संत आणि भाविकगण येत असतात. यंदा प्रयागराजमध्ये झालेल्या महाकुंभाला अपेक्षेपेक्षा अधिक भाविकगण आले होते. महाराष्ट्रातून प्रयागराजला जाणाऱ्या भाविकांची संख्याही लक्षणीय होती त्यामुळे यावेळी नाशिक नगरीत होणारा सिंहस्थ कुंभमेळा गर्दीच्या बाबतीत आधीचे सर्व रेकॉर्ड मोडीत काढील असा विश्वास राज्य सरकार तसेच नाशिक महानगरपालिकेला आहे त्यामुळे २०२७ मध्ये होणाऱ्या या पर्वाच्या तयारीला मागील सहा महिन्यांपासूनच सुरुवात झाली आहे. कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या साधू संतांसाठी प्रत्येक सिंहस्थाच्या निमित्ताने साधुग्राम उभारण्यात येतो. यंदा हा साधुग्राम नाशिकमधील तपोवन क्षेत्रात सुमारे ११५० एकरमध्ये उभारण्याची योजना कुंभमेळा प्रशासनाने आखली आहे आणि त्यासाठी परिसरातील १८०० झाडे तोडण्यात येणार असल्याची चर्चा आहे. ही झाडे वाचवण्यासाठी विविध पर्यावरणप्रेमी संघटना तपोवन परिसरात एकवटल्या असून विविध राजकीय पक्षांनीही या आंदोलनात उडी घेऊन सरकारला लक्ष्य केले आहे. झाडे वाचवण्याविषयी आपले मत मांडताना अभिनेते सयाजी शिंदे यांनी 'साधू आले-गेले तरी काही फरक पडत नाही' असे विधान करून ज्यासाठी एव्हढा मोठा कुंभमेळा आयोजित केला जातो त्या साधू संतांनाच गौण ठरवल्याने त्यांना संत महंतांच्या टीकेला सामोरे जावे लागले आहे. हिंदुत्ववादी संघटनाही सयाजी शिंदे यांच्या या वक्तव्याने नाराज झाल्या असून ज्या क्षेत्राचा आपला अभ्यास नाही त्याविषयी सयाजी शिंदे यांनी काही बोलू नये असा उपरोधिक सल्ला यानिमित्ताने त्यांना देण्यात आला आहे. महाराष्ट्र ही मुळातच साधू संतांची भूमी आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे....' यांसारख्या अभंगांतुन तुकोबारायांनी वृक्षांचे महत्व अधोरेखित केले आहे. संत ज्ञानेश्वर, संत सावता माळी यांसह अनेक साधू संतांनी निसर्गाची, पर्यावरणाची महती आपल्या अभंगातून आणि लेखनातून वर्णिली आहे. साक्षात भगवंतानेच निसर्गाची निर्मिती केली असून त्याच्या सानिध्यामध्ये राहणे साधू संतांना नेहमीच आवडते. कुंभमेळ्याच्या निमित्ताने लाखोंच्या संख्येने एकवटणारे बहुतांश साधू संत एरव्ही जगातील मोह मायेपसून दूर निसर्गाच्या सानिध्यातच राहात असतात देवादिकांच्या अवतारांनीही आपल्या अवतारकार्यात निसर्ग जपण्याची शिकवण विविध प्रसंगांतून दिली आहे. महाभारत ग्रंथात सुद्धा वृक्ष-लतांचे महत्व सांगणारे स्वतंत्र वनपर्व आहे. त्यामुळे झाडे तोडून किंवा निसर्गाचा ऱ्हास करून साधू संतांच्या निवासाची सरकारकडून व्यवस्था करण्यात येणार असेल, तर ते त्यांनाही आवडणार नाही. तपोवन भूमीतील वृक्षतोडीची बातमी कळताच आता साधू संतांनीसुद्धा सरकारला तसे न करण्याविषयी सूचना दिल्या आहेत. त्यामुळे सरकारच्या या निर्णयाशी साधू संतांना जोडणे योग्य नव्हे. मागील सिंहस्थ कुंभपर्वाच्या वेळी एकही झाड न तोडता साधुग्रामची उभारणी करण्यात आली होती मग याच वर्षी झाडे तोडणाची गरज का भासावी ? कुंभपर्वाचे निमित्त पुढे करून सरकार येथील भूखंड सपाट करत आहे. भविष्यात तो कोणाच्या तरी घशात घालण्याचा डाव असल्याचा आरोप विरोधी पक्षाकडून केला जात आहे त्याबाबत शहानिशा करण्याचीही आज आवश्यकता आहे. वृक्षतोडीचे भांडवल करून काही पुरोगामी विचारांचे महाभाग आता कुंभमेळा रद्द करण्याची भाषा करू लागले आहेत त्यांच्या तर बुद्धीची कीव करावीशी वाटते. सिहंस्थ कुंभपर्वाच्या निमित्ताने गंगेसमान असलेल्या गोदापात्रात शाहीस्नान करण्यासाठी हजारो किलोमीटरची पायपीट करून साधू संत नाशिक नगरीत दाखल होतात त्यामुळे त्यांची चोख व्यवस्था करणे सरकारचे कर्तव्य आहे; मात्र ते करत असताना निसर्गाचा समतोल ढळता कामा नये हे पाहणेही सरकारचेच काम आहे त्यामुळे सरकारने साधुग्राम उभारण्याबाबत निर्माण झालेला पेच सोडवण्यासाठी अध्यात्मिक क्षेत्रातील अधिकारी व्यक्तींसोबत सल्ला मसलत करून योग्य तो निर्णय घ्यायला हवा !

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## वाचक पत्र


### सुरक्षित प्रवासासाठी हेल्मेट गरजेचे !



सद्या दुचाकी अपघाताचे प्रमाण वाढले असून त्यामध्ये प्रामुख्याने डोकीला गंभीर इजा होवून मृत्यू होण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे प्रत्येकाने हेल्मेट वापरुन दुचाकी चालवावी त्यासाठी पोलिस वरचेवर प्रयत्न करतांना दिसतात मात्र याकडे दुर्लक्ष करुन दुचाकीस्वार विना हेल्मेटचे वाहन चालवून आपला लाख मोलाचा जीव गमावून बसतात देशांतील काही राज्यांत हेल्मेट सक्ती आहे तर काही ठिकाणी नाही मात्र प्रत्येकाने हेल्मेट वापरणे काळाची गरज आहे हे अपघातामध्ये घडलेल्या घटनांवरुन अधोरेखित झाले आहे आज झपाट्याने वाहनांची संख्या वाढत आहे त्याचं प्रमाणात अपघातही वाढत आहेत आपण वाहन चालवताना सुरक्षित असतो तोपर्यंत हेल्मेटचे महत्व कळत नाही मात्र अपघाताने डोक्याला गंभीर इजा होवून मृत्यू होतो त्यावेळी मात्र हेल्मेटचे महत्व कळते हे वास्तव आहे अवजड वाहनांने धडक दिली, एखाद्या वाहनाला दुचाकीस्वार जाऊन आदळला किंवा दुचाकी घसरुन रस्त्यावर पडली तर त्याचा फटका वाहनधारक दुचाकीस्वारालाचं बसतो अपघातांनंतर अन्य कोणत्या अवयवांना इजा झाली तर ते जिवावर बेतत नाही यातून माणूस वाचू शकतो पण डोकीला दुखापत झाली तर दुचाकीस्वार वाचण्याची शक्यता कमी असते यापासून स्वतःचा बचाव करायचा असेल तर प्रत्येक दुचाकीस्वाराने हेल्मेट परिधान करणे गरजेचे आहे पण बहुतांश दुचाकी वाहन चालक हेल्मेट वापरत नसल्याने अशा अपघातामध्ये मृत्यूचे प्रमाण वाढले आहे त्याकरिता दुचाकीस्वारांनी आपला प्रवास सुरक्षित आणि सुखाचा व्हावा यासाठी हेल्मेटचा वापर करणे गरजेचे आहे !

**- राजू जाधव,**
**मांगूर जि.बेळगांव**

## महाराष्ट्राच्या राजकारणात गौतमी पाटील हिची एन्ट्री



**दि.०१, नागपूर :** राज्यभरात सध्या नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांच्या प्रचाराचा धुराळा उडताना बघायला मिळत आहे. राज्यभरात उद्या विविध नगर परिषद आणि नगर पंचायतींच्या निवडणुकांसाठी मतदान पार पडणार आहे. निवडणूक प्रक्रियेत काही गोष्टींना विलंब झाल्याने प्रचारासाठी एक दिवसांचा कालावधी निवडणूक आयोगाकडून वाढवून मिळाला होता. निवडणूक आयोगाने सोमवारी रात्री दहा वाजेपर्यंत प्रचार करण्यास मुभा दिली होती. त्यामुळे आज रात्री दहा वाजता सर्वत्र प्रचाराचा तोफा थंडावणार आहे. त्यानंतर लगेच उद्या सकाळी मतदानाला सुरुवात होणार आहे. त्यामुळे आजचा दिवस हा सर्व उमेदवारांसाठी महत्त्वाचा होता. या अंतिम क्षणामध्ये काँग्रेसने चंद्रपुरात मोठी क्लृप्ती वापरली. मतदारांना आकर्षित करण्यासाठी काँग्रेसने इथे मोठी राजकीय खेळी केली.

चंद्रपूर जिल्ह्यातील मूल शहरात आज काँग्रेसची प्रचारसभा आकर्षक ठरली. कारण या प्रचारसभेत चक्क डान्सर गौतमी पाटील प्रचार करताना बघायला मिळाली. त्यामुळे या प्रचारसभेला मोठी गर्दी झालेली बघायला मिळाली. गौतमी पाटील हिचे राज्यात लाखो चाहते आहेत. त्यामुळे गौतमी पाटील प्रचार करताना दिसली तर तिच्या प्रचाराभोवती गर्दी होणं ही साहजिच आहे. चंद्रपूरच्या मूल शहरात आज अनेक जण गौतमी पाटील हिला काँग्रेसचा प्रचार करताना पाहून आश्चर्यचकीत झाले. सेलेब्रेटींच्या माध्यमातून याआधीदेखील प्रचार झाले आहेत. गौतमी पाटील हिने मूल शहरात काँग्रेसच्या उमेदवार एकता समर्थ यांच्या प्रचारासाठी रोड शो केला. एका उघड्या जीपमधून गौतमी पाटील हिच्यासोबत काँग्रेसच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार आणि नगरसेवक पदाचे नगरसेवक यांनी रोड शो केला. यावेळी गौतमी पाटील हिने मतदारांना काँग्रेसला मतदान करण्याचं आवाहन केलं.

गौतमी नाकात नथणी आणि गळ्यात काँग्रेसचा गमछा परिधान करुन प्रचारात सहभागी झाली होती. मूलमधील दुर्गा माता मंदिरपासून तिचा रोड शो निघाला होता. यावेळी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आलं. गौतमी पाटील हिने सर्वांना हात दाखवत काँग्रेसला मतदान करण्याचं आवाहन केलं.

# राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व... मनोहर जोशी....



राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाणारे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांची आज जयंती. अत्यंत गरीब कुटुंबात २ डिसेंबर १९३७ रोजी जन्मलेले मनोहर जोशी यांचा शिवसैनिक ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हा प्रवास थक्क करणारा आहे. नगरसेवक, महापौर, आमदार, विरोधी पक्ष नेते, मुख्यमंत्री, केंद्रीय मंत्री ते लोकसभेचे अध्यक्ष असा त्यांचा राजकीय प्रवास आहे.

शिवसेनेची स्थापना १९६६ साली झाली आणि पुढच्याच वर्षी म्हणजे १९६७ साली मनोहर जोशींनी शिवसेनेत प्रवेश केला म्हणजे शिवसेनेच्या पहिल्या फळीचे ते नेते होते. शिवसेनेच्या अनेक आंदोलनात त्यांनी हिरीरीने भाग घेतला होता. शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे ते अत्यंत विश्वासू आणि निष्ठावंत साथीदार होते म्हणूनच १९९५ साली शिवसेना भाजप युतीचे सरकार सत्तेत आल्यावर बाळासाहेबांनी त्यांना थेट मुख्यमंत्र्यांच्या खुर्चीवर बसवले.

१४ मार्च १९९५ ते ३१ जानेवारी १९९९ या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर त्यांना केंद्रात मंत्रीपद आणि लोकसभेचे अध्यक्षपदही मिळाले. १९९९ ते २००२ या याकाळात ते अटलबिहारी वाजपेयी यांच्या मंत्रिमंडळात केंद्रीय मंत्री होते तर २००२ ते २००४ या काळात ते लोकसभेचे अध्यक्ष होते. महाराष्ट्राच्या राजकारणात पाच दशकांहून अधिक काळ राहूनही त्यांचा कोणाशी वाद झाला नाही. त्यांच्या मितभाषी व प्रेमळ स्वभावाने त्यांनी सर्वांची मने जिंकली.

विरोधी पक्षातही त्यांच्या विषयी आदराची भावना होती म्हणूनच त्यांना राजकारणातील अजातशत्रू व्यक्तिमत्व असे म्हंटले जाते. राजकारणा प्रमाणे व्यवसायातही त्यांनी यश मिळवले. कोहिनूर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून महाराष्ट्रातील असंख्य तरुणांना प्रशिक्षित करून रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम त्यांनी केले. मनोहर जोशी यांनी काही पुस्तके लिहिली. त्यांनी लिहिलेले शिवसेना काल - आज - उद्या हे पुस्तक म्हणजे शिवसेनेचे चरित्र लेखन आहे. मनोहर जोशी हे शिवसेनेच्या ५० वर्षाच्या चढ उताराचे साक्षीदार होते. १९६७ साली शिवसेनेत प्रवेश केलेले मनोहर जोशी अखेरच्या श्वासापर्यंत शिवसेनेशी एकनिष्ठ राहिले. शिवसेना हाच त्यांचा श्वास, शिवसेना हाच त्याचा प्राण आणि बाळासाहेब हेच त्यांचे एकमेव दैवत होते. बाळासाहेब त्यांना पंत म्हणून संबोधत. मागील वर्षी २३ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बाळासाहेबांच्या मुशीत तयार झालेला एक कट्टर शिवसैनिक काळाच्या पडद्याआड गेला. राजकारणात असूनही सर्वांशी मैत्रीचे संबंध असणारे अजातशत्रू व्यक्तिमत्व मनोहर जोशी यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

